राज्यातील शासकीय/महानगरपालिकेच्या महाविद्यालयातून वैद्यकीय पदवी, पदव्युत्तर व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांनी विनिर्दिष्ट कालावधीसाठी शासन सेवा करणे अनिवार्य असल्याबाबत......

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१३/प्र.क्र.१०१/१३/शिक्षण-२
दिनांकः- ३१ जानेवारी, २०१४

वाचाः-१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एनओसी-३०९५ /सीआर-३०७/९५/शिक्षण-१, दि. २८.०२.१९९६.
२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१३९७ /सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि. १९.०१.१९९८.
३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१३९७ /सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि. ०६.०२.१९९८.
४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१३०१ /४०६५/सीआर-४१८/२००१/शिक्षण-१, दि. २०.११.२००१.
५) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक पीजीएम-१००४ /सीआर-६३३/०४/शिक्षण-२, दि. ११.०३.२००५.
६) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१००६ /सीआर-०५/०६/शिक्षण-२, दि. ३१.०७.२००५.
७) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१००७ /सीआर-४९०/०७/शिक्षण-२, दि. ०८.०२.२००८.
८) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१०१० /सीआर-१८४/१०/शिक्षण-२, दि. २८.०५.२०१०.
९) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमईडी-१०१२ /सीआर-१३/१२/शिक्षण-२, दि. २१.०३.२०१२.

**प्रस्तावनाः-** शासकीय अथवा महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासनाकडून /महानगरपालिकेकडून मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. या खर्चाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येत असलेले शैक्षणिक शुल्क अत्यल्प आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासन/महानगरपालिका करीत असलेला खर्च हा जनतेकडून आकारण्यात येत असलेल्या कराच्या उत्पन्नातून भागविला जात असल्याने जनतेच्या ऋणांची काही अंशी परतफेड व्हावी या उद्देशाने पदवी/पदव्युत्तर/अतिविशेषोपचार अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकडून शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/सरंक्षण दलाची सेवा करण्याबाबतचे बंधपत्र लिहून घेण्यात येते. सदर सेवांची व्याप्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-** शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय अथवा दंत महाविद्यालयातून पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका व अतिविशेषोपचार (सुपर स्पेशालिटी) अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांने "भारत सरकार वा भारत सरकारचे उपक्रम/ महाराष्ट्र शासन वा महाराष्ट्र शासनाचे उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था वा स्थानिक स्वराज्य संस्थेचे उपक्रम" यांची केलेली वैद्यकीय सेवा बंधपत्रित सेवा म्हणून ग्राहय धरण्यास शासन याव्दारे मान्यता देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अंजली वि. अंभिरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सचिव, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली (पत्राव्दारे)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५ प्रती)
संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
सर्व अधिष्ठाता, शासकीय/महानगरपालिका वैद्यकीय/दंत महाविद्यालये.
मा.मंत्री (वै.शि.)/ मा.राज्यमंत्री (वै.शि.)यांचे स्वीय सहायक
मा.मंत्री (सा.आ.वि.)/मा.राज्यमंत्री (सा.आ.वि.) यांचे स्वीय सहायक
विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी.
निवडनस्ती (शिक्षण-२)